



# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २२१, गुरुवार १६ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बुथनिहाय मतदान यादी अद्यापही नाही!

## ■ ७० टक्क्यांची आकडेवारी उशिरा का होईना जाहीर
## ■ कलेक्टर सालीमठांभोवती संशयाचे मळभ कायम




| Electors Male | Electors female | Electors Other | Electors total | End of Poll Turnout Male | End of Poll Turnout female | End of Poll Turnout Other | End of Poll Turnout total | Turnout % Male | Turnout % female | Turnout % Other | Turnout % total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 176772 | 164200 | 3 | 340975 | 129346 | 109777 | 1 | 239124 | 73.17% | 66.86% | 33.33% | 70.13% |

| Sr.No. | AC No. | AC Name | Total Voters Male | Total Voters Female | Total Voters Other | Total Voters Total | Total Voters (Who voted) Male | Total Voters (Who voted) Female | Total Voters (Who voted) Other | Total Voters (Who voted) Total | Voting Percentage Male | Voting Percentage Female | Voting Percentage Other | Voting Percentage Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 222 | Shevgaon | 189410 | 171779 | 5 | 361194 | 125174 | 102490 | 2 | 227666 | 66.09 | 59.66 | 40.00 | 63.03 |
| 2 | 223 | Rahuri | 163041 | 148703 | 1 | 311745 | 118223 | 100012 | 0 | 218235 | 72.51 | 67.26 | 0.00 | 70.00 |
| 3 | 224 | Parner | 176772 | 164200 | 3 | 340975 | 129346 | 109777 | 1 | 239124 | 73.17 | 66.86 | 33.33 | 70.13 |
| 4 | 225 | Ahmednagar City | 154344 | 147632 | 107 | 302083 | 101098 | 87649 | 48 | 188795 | 65.50 | 59.37 | 44.86 | 62.50 |
| 5 | 226 | Shrigonda | 172043 | 156920 | 3 | 328966 | 124439 | 98913 | 0 | 223352 | 72.33 | 63.03 | 0.00 | 67.90 |
| 6 | 227 | Karjat-Jamkhed | 177336 | 159567 | 0 | 336903 | 123047 | 99949 | 0 | 222996 | 69.39 | 62.64 | 0.00 | 66.19 |
| | | Total | 1032946 | 948801 | 119 | 1981866 | 721327 | 598790 | 51 | 1320168 | 69.83 | 63.11 | 42.86 | 66.61 |

नगर : प्रतिनिधी

**पारनेर नगर मतदान संघात मतदारांनी बजावलेल्या हक्काबाबत कलेक्टर सिद्धाराम सालीमठ खरी माहीती देण्यास मतदान होउन दोन दिवस उलटले तरी तयार नाहीत ! सुरूवातीस पारनेर-नगर मतदार संघात ६३.९७ टक्के मतदान झाल्याचे स्वतःच्या सहीने जाहीर करणाऱ्या कलेक्टरांनी बोंबाबोंब झाल्यानंतर ७०.१३ टक्के मतदान झाल्याचा अहवाल दिला खरा, मात्र बुथनिहाय यादी अद्यापही अधिकृतरित्या प्रसिध्द करण्यात आली नाही. निवडणूक प्रक्रियेच्या आधीपासून ठराविक उमेदवाराला पोषक भुमिका घेणारे नगरचे कलेक्टर सिध्दाराम सालीमठ यांच्या भोवतीचे संशयाचे मळभ या भूमिकेमुळे अधिक गडद झाले आहे.**

लोकसभा निवडणूकीसाठी दि. १३ मे रोजी मतदान प्रक्रिया सुरू झाल्यानंतर पारनेर-नगर मतदासंघात मतदारसंघाचा आमदार लोकसभा निवडणूकीसाठी उमेदवार असल्याने साहाजिकच उत्साह होता. सकाळपासूनच मतदार घराबाहेर पडले आणि मतदान केंद्राबाहेर रांगाच्या रांगा लागल्या. असे असतानाही ठराविक कालवधीनंतर महसूल विभागाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदानाच्या आकडेवारीत पारनेर-नगर मतदार संघात कमी मतदान होत असल्याची आकडेवारी जाणिवपुर्वक प्रसिध्द करण्यात आली. लंके यांच्यासाठी संपूर्ण मतदारसंघात पुढाकार घेणाऱ्या सर्वसामान्य मतदारासह लंके समर्थकांसाठी ही त्यांच्या काळजाचा ठोका चुकविणारी बातमी होती.

दुसरीकडे मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या रांगा लागलेल्या असताना महसूल विभागाकडून अशी चुकीची माहीती का प्रसिध्द करण्यात येते याबाबत लंके समर्थक संभ्रमात होते. त्यांनी तहसिलदार गायत्री सैदाणे यांच्याशी संपर्क करून माहीती घेतली असता अंतिम टप्प्यात खरी आकडेवारी प्रसिध्द होईल असे सांगण्यात आले. एकीकडे इतर मतदारसंघातील मतदानाची वास्तव आकडेवारी पुढे येत असताना पारनेरसाठीच वेगळा न्याय का याबाबत पारनेर तहसिल कार्यालयाकडून मात्र काहीही खुलासा झाला नाही.

### एक तासात वाढले १७ टक्के !

**सायंकाळी ४६ टक्क्यांपर्यंत मतदार झाल्याची माहीती महसूल विभागाने प्रसिध्द केली. ही आकडेवारी संपूर्ण मतदारसंघातील इतर तालुक्यांपेक्षा कमी होती. मतदान संपल्यानंतर मात्र मतदान ६३ टक्के झाल्याचे सांगण्यात आले. एक तासात १७ टक्के मतदान कसे वाढते याचे प्रात्यक्षिक खरे तर कलेक्टर सिध्दराम सालीमठ किंवा तालुका महसूल प्रशासनाने दिले पाहिजे.**

### ठराविक उमेदवाराच्या फायद्यासाठी आटापीटा !

**मतदान प्रक्रिया सुरू असताना कार्यकर्त्यांकडून बुथनिहाय माहीती संकलीत करण्यात येत होती. त्यांनी घेतलेली माहीती व महसूल प्रशासनाकडून देण्यात येणा-या माहीतीमध्ये प्रचंड विसंगती येत होती. त्यातच दुपारनंतर पारनेरमध्ये मतदारांमध्ये निरूत्साह, सर्वात कमी मतदान अशा बातम्या जाणिवपुर्वक पसरविण्यात आल्या. याचाच अर्थ महसूल प्रशासन पारनेरमध्ये कमी मतदान होत असल्याचे भासवून ठराविक उमेदवारास फायदा मिळवून देण्यासाठी आटापिटा करत असल्याचेही उघड झाले.**

### टक्केवारी जाहीर मग बुथनिहाय यादी का नाही ?

**कलेक्टर सालीमठ यांनी पारनेर तालुक्यात ६३ टक्के मतदान झाल्याचे अधिकृतपणे जाहीर केल्यानंतर प्रत्यक्षात ७० टक्के मतदान झाल्याची बोंबाबोंब झाली. त्यानंतर मंगळवारी उशिरा ७०.१३ टक्के मतदान झाल्याचे पुन्हा कलेक्टरांनी जाहिर केले. एकदा ७०.१३ टक्के ही आकडेवारी निश्चित झाल्यानंतर बुथनिहाय यादी प्रसिध्द करण्यात काहीही अडचण नसायला हवी होती, मात्र ही यादी गुरूवारी देतो असे सांगत कलेक्टरांनी पारनेरच्या मतदानाविषयी संदिग्धता कायम ठेवली आहे.**

### पारनेरचे अधिकारी, कर्मचारी नगरला !

**पारनेर तहसिल कार्यालयात मंगळवारी निवडणूक शाखेतील एकही अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्याचे चित्र पहावयास मिळाले. माहीती घेतली असता ते नगरमध्ये असल्याचे सांगण्यात आले. खरे तर त्या त्या मतदारसंघाचे निवडणूकीचे काम त्या त्या तालुक्याच्या ठिकाणीच करण्यात येत असताना अधिकारी व कर्मचारी नगरमध्ये का पाचारण करण्यात आले ? याचे उत्तरही गुलदस्त्यात आहे. शिवाय सबंधित पारनेरहून आलेले फोनही स्विकारत नव्हते.**

### सोमवारीच ७० टक्के मतदानाची माहीती

**या यंत्रणेत काम करणाऱ्या नायब तहसिलदाराने मतदान झाल्यानंतर मंगळवारी सकाळीच ७०.१३ टक्के मतदान झाल्याचे जाहिर केले होते. जर मंगळवारी सकाळीच एकूण मतदानाची टक्केवारी निश्चित झालेली असताना जिल्हाधिकाऱ्यांनी मंगळवारी दुपारी ६३ टक्के मतदानाची आकडेवारी कशी जाहिर केली जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झालेली माहीती ही पारनेर तहसिल कार्यालयाकडूनच झालेली असताना जिल्हाधिकारी कार्यायल कमी आकडेवारी कशी जाहिर करू शकते ?**

### अधिकारी, कर्मचाऱ्यांची मौज-मजा

**एकीकडे तहसिल कार्यालयात शुकशुकाट असताना काही अधिकारी व कर्मचारी ढाब्यांवर मजा हजा करीत असल्याचे चित्रही पहावयास मिळत आहे. सर्वसामान्यांची कामे खोळंबलेली असताना तहसिलमधील अधिकारी व कर्मचारी ढाब्यांवर रेंगाळत असल्याने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या तालुक्यात सर्वसामान्यांचा कोणी वाली आहे की नाही असा सवाल जिल्हा प्रशासनाकडे करण्यात येत आहे.**

# कांद्यावर बोला...कांद्यावर बोला!

## मोदींच्या सभेत शेतकऱ्यांच्या घोषणा

नाशिक : प्रतिनिधी




**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आता महाराष्ट्रातल्या पाचव्या टप्प्यासाठी प्रचार करत आहेत. दिंडोरी या ठिकाणी त्यांनी भारती पवार यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. या सभेत त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर जोरदार टीका केली. त्यानंतर त्यांनी त्यांचा मोर्चा काँग्रेसकडे वळवला. काँग्रेसची सत्ता आली तर ते अर्थसंकल्पातला १५ टक्के भाग अल्पसंख्यांकासाठी राखून ठेवतील असं वक्तव्य नरेंद्र मोदींनी केलं. तेवढ्यात एक शेतकरी कांद्यावर बोला अशा घोषणा देऊ लागला. त्यानंतर त्या शेतकऱ्याला बाहेर काढण्यात आलं.**

**काय म्हणत होते नरेंद्र मोदी?**

"आम्ही देशात सरकार म्हणून जेव्हा योजना तयार करतो तेव्हा जात-पात धर्म पाहात नाही. ती योजना सगळ्यांसाठीच असते. सगळ्यांना योजनांचा लाभ मिळतो. मात्र काँग्रेसची नियत कशी आहे ते मी तुम्हाला सांगतो आहे. नाशिक ही प्रभू रामचंद्रांची भूमी आहे त्यामुळे मी तुम्हाला विषय सांगतो आहे. काँग्रेसचा विचार असा आहे की देशातलं सरकार जे बजेट तयार करतं त्या बजेटमधला १५ टक्के भाग अल्पसंख्याकांसाठी ठेवावा." दिंडोरीतल्या भाषणांत मोदी हे बोलत होते तेवढ्यात समोरच्या गर्दीतून घोषणा ऐकू आली कांद्यावर बोला.

**नेमकं काय घडलं?**

पंतप्रधाननरेंद्र मोदीभाषण करत होते तितक्यात समोरुन घोषणा आली, "कांद्यावर बोला.. कांद्यावर बोला." या शेतकऱ्याने दोन ते तीन वेळा घोषणा दिल्या. त्यानंतर मोदी एक क्षण थांबले, समोरुन मोदी-मोदी अशा घोषणा येऊ लागल्या. त्यानंतर मोदींनी जय श्रीराम च्या घोषणा दिल्या. भारतमाता की जय या घोषणाही दिल्या. तसंच पुढे त्यांनी आपला मुद्दा पूर्ण केला. मोदींच्या सभेत गोंधळ घालणाऱ्या या शेतकरी तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आणि सभास्थळावरुन बाहेर नेलं.

**धर्माच्या आधारे आरक्षण मिळू देणार नाही**

धर्माच्या आधारावर बजेटचा एक हिस्सा मुस्लिम समाजासाठी असावा असं काँग्रेसला वाटतं आहे. मात्र मी हे होऊ देणार नाही हे त्यांनी लक्षात ठेवलं पाहिजे असंही नरेंद्र मोदी भाषणात म्हणाले. तसंच धर्माच्या नावावर आरक्षणही दिलं जाणार नाही असंही मोदी यांनी म्हटलं आहे. वंचितांना त्यांचा अधिकार मिळालाच पाहिजे. मोदी त्यासाठी चौकीदार म्हणून बसलो आहे. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**शेतकरी बांधव कधीही मला विसरणार नाहीत**

माझे शेतकरी बांधव मला कधीच विसरणार नाहीत.काँग्रेसकाळात शेतकऱ्यांसाठी खोटी पॅकेजेस जाहीर व्हायची. तुम्ही सांगा एक रुपया तरी मिळाला का ? आम्ही सत्तेत आल्यापासून शेतकऱ्यांचं हितच पाहिलं आहे. कांदा उत्पादन आणि द्राक्षं यांच्यासाठी नाशिक प्रसिद्ध आहे. आमचं सरकार असं आहे ज्या सरकारने पहिल्यांदा कांद्याचा बफर तयार केला. आधीच्या सरकारांनी अशी व्यवस्था केली नव्हती. मागच्या सिझनमध्ये सात लाख मेट्रिक टन कांदा खरेदी केला. तसंच ५ लाख मेट्रिक टनचा बफर आम्ही तयार करतो आहोत. मागच्या दहा वर्षांत कांद्याची निर्यात ३५ टक्के वाढली आहे. दहा दिवसांपूर्वीच आम्ही कांदा निर्यातबंदी हटवली आहे असंही मोदी यांनी म्हटलं आहे.

# साईच्या झोळीत एक्स-रे मशिनचे दान !

## रूग्णांना होणार मोठा लाभ

शिर्डी : प्रतिनिधी



**सबका मालिक एक आणि श्रद्धा सबुरीचा संदेश देणाऱ्या साईबाबांच्या झोळीमध्ये देश विदेशातील साई भक्त भरभरून दान करत असतात. मंगळवारी एका साई भक्ताने साई चरणी मोठे दान करत साईबाबा संस्थानच्या रुग्णालयाला एक कोटी रुपयांचे एक्स-रे मशीन दान स्वरूपात दिले आहे. या दानामुळे साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा घेता येणार आहे.**

साईबाबा संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रूग्णालयाच्या एक्स रे विभागाकरीता मायलॉन लॅब्रोटरीज यांचेकडून एकूण ०१ कोटी १५ लाख रूपये किंमतीचे दोन अद्यावत एक्स-रे मशिन देणगी स्वरुपात प्राप्त झाले असल्याची माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. सदर मशीन साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ रूग्णालयाच्या एक्स-रे विभागात बसविण्यात येऊन त्यांची मायलॉन कंपनीचे अध्यक्ष राजीव मलिक व त्यांच्या सुविद्य पत्नी सिमा मलिक यांचे हस्ते पुजा करुन उदघाटन करण्यात आले.

यानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचे हस्ते देणगीदार साईभक्त राजीव मलिक व सिमा मलिक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मायलॉन कंपनीचे व्यवस्थापक जितेंद्र खैरे, साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक डॉ. प्रितम वडगावे, वैद्यकिय अधिक्षीका डॉ. मैथिली पितांबरे, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, अधिसेविका मंदा थोरात, नजमा सय्यद, बायोमेडीकल विभागाचे इंजिनिअर राजेश वाकडे, तुषार कुटे, श्रध्दा कोते व स्टोअर किपर सुनिल निकम आदी उपस्थित होते.

मायलॉन लॅब्रोटरीज कंपनीच्या वतीने संस्थान रूग्णालयाकरीता यापुर्वी सुमारे १ कोटीहून अधिक किंमतीच्या विविध मशिनरी व ॲम्बुलन्स देणगी स्वरुपात मिळाले आहेत.

# अजित पवारांनी व्यक्त केली होती प्रदेशाध्यक्षपदाची इच्छा

## जयंत पाटील यांचा गौप्यस्फोट



पुणे : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सध्या सुरू आहे. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या दोन वर्षात घडलेल्या राजकीय घडामोडीसंदर्भात अनेक नेते गौप्यस्फोट करत आहेत. दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली, त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह भाजपाबरोबर जात सरकार स्थापन केलं. त्यानंतर काही दिवसांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. अजित पवारही काही आमदारांबरोबर सत्तेत सहभागी झाले. त्यामुळे मागील दोन वर्षात राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडल्या.**

या सर्व घडामोडींवर भाष्य करत असताना राष्ट्रवादीकाँग्रेसशरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्षजयंत पाटीलयांनी मोठं विधान केलं आहे. राष्ट्रवादीत फूट पडण्याच्या आधी राष्ट्रवादीच्या एका मेळाव्यात बोलतानाअजित पवारयांनी प्रदेशाध्यक्ष

उर्वरीत पान ३ वर




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
**Saint Vivekanand Public School**
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



फॅशन | संसार | सौंदर्य
सखी



# आवळयापासून मिळवा इन्स्टंट ग्लो!

**आवळ्यामध्ये मोठ्याप्रमाणात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन्स असतात. त्यामुळे नितळ त्वचेसाठी तुम्ही आवळ्याचा वापर करू शकता. आवळ्यामध्ये असलेले व्हिटॅमिन-सी, लोह, बीटा कॅरोटीन, पोटॅशियम, कॅल्शियम इत्यादी त्वचेचे डिटॉक्सिफिकेशन करतात त्याचप्रमाणे आवळा त्वचेच्या प्रत्येक आजारापासून आपल्याला दूर ठेवतो.आवळ्यामध्ये असलेले घटक चेहऱ्यावरील डाग आणि सुरकुत्या कमी करून त्वचा चमकदार बनवतात. यासाठीच आवळ्याचा वापर करून तुम्ही नितळ त्वचा मिळवू शकता. यासाठी तुम्ही घरच्याघरी तयार होणारे फेसफॅक तयार करू शकता.**

## आवळा आणि दह्यापासून बनवलेला फेसपॅक

जर तुम्हाला सन टॅन, मुरुम इत्यादीपासून नैसर्गिकरित्या मुक्तता मिळवण्यासाठी तुम्ही हा फेसपॅक वापरू शकता. हा फेसपॅक तयार करण्यासाठी एका भांड्यात २-३ चमचे आवळा पावडर घ्या. त्यात एक चमचा साधे दही घाला. हे मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर तसेच मानेवर लावा. 3-5 मिनिटे त्वचेला हळुवारपणे मसाज करा. 10 ते 15 मिनिटे त्वचेवर राहू द्या. यानंतर साध्या पाण्याने धुवा.

## आवळा आणि पपईचा फेस पॅक

हा फेसपॅक तयार करण्यासाठी आवळा बारीक करून घ्या. या ताज्या रसामध्ये पपई मिसळा. नीट मिसळल्यानंतर चेहऱ्यावर लावा. आवळ्यापासून बनवलेला हा मास्क चेहऱ्यावर लावण्यासाठी चेहरा व्यवस्थित स्वच्छ करा. 15 मिनिटे राहू द्या आणि नंतर कोमट पाण्याने धुवा.

## आवळा आणि कोरफड फेस पॅक

एक चमचा कोरफडचा गर आणि एक चमचा आवळ्याचा रस मिसळून मिश्रण तयार करा. हे मिश्रण चेहऱ्यावर तसेच मानेवर लावा. 3-5 मिनिटे आपल्या बोटांच्या टोकांनी त्वचेला हळूवारपणे मसाज करा. 15-20 मिनिटे त्वचेवर राहू द्या आणि नंतर स्वच्छ पाण्याने चेहरा धुवा. तुम्ही हा अँटीएजिंग फेस पॅक आठवड्यातून दोनवेळा वापरू शकता.



- हळदीचा फेस पॅक : हा फेसपॅक बनवण्यासाठी तुमच्याकडे आवळा पावडर आणि हळद असणे आवश्यक आहे. आता एक चमचा आवळा पावडरमध्ये चिमूटभर हळद मिसळा. आता पाण्यातून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट थोडा वेळ अशीच झाकून ठेवा. तयार मिश्रण चेहऱ्यावर 10 ते 15 मिनिटे लावा.
- आवळा आणि मुलतानी मातीचा फेस पॅक : सर्वप्रथम मुलतानी माती आणि आवळा पावडर एकत्र करा. आता पपईचा गर आणि गुलाबजल एकत्र करा. आता एका भांड्यात पपईच्या लगद्यामध्ये गुलाबजल, मुलतानी माती आणि आवळा पावडर घाला. तयार मिश्रण 15 ते 20 मिनिटे चेहऱ्यावर लावा. हे मिश्रण तुम्ही आठवड्यातून दोनदा वापरू शकता.
- आवळा आणि मधापासून बनवलेला फेस पॅक : एक चमचा मध आणि एक चमचा ताज्या आवळ्याचा रस मिसळून फेस पॅक तयार करा. हे मिश्रण संपूर्ण चेहऱ्यावर आणि मानेवर लावा आणि काही मिनिटे बोटांनी हलक्या हाताने मसाज करा. 15-20 मिनिटे त्वचेवर राहू द्या. यानंतर साध्या पाण्याने धुवा.
- आवळा आणि लिंबाचा फेस पॅक : एका भांड्यात २-३ चमचे आवळा पावडर घ्या. त्यात अर्ध्या ताज्या लिंबाचा रस घाला. तसेच थोडे पाणी घालून सर्व गोष्टी एकत्र करा. या फेस मास्कचा एक समान थर संपूर्ण चेहऱ्यावर लावा आणि 15-20 मिनिटे त्वचेवर राहू द्या. यानंतर चेहरा साध्या पाण्याने धुवा. आठवड्यातून दोन ते तीनदा वापरू शकता.
- आवळा आणि लाल मसूर फेस पॅक : हा फेसपॅक तयार करण्यासाठी आवळा पावडर आणि लाल मसूर एकत्र करा. आता लाल मसूर रात्री दुधात भिजवा. दुसऱ्या दिवशी डाळ फुगली की त्यात आवळा पावडर टाका. हे दोन्ही चांगले मिसळून तयार करा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर 10 ते 15 मिनिटे लावा. 15 मिनिटांनी चेहरा सामान्य पाण्याने धुवा.



# चेहऱ्याला ठेवा हायड्रेट!



**उन्हात त्वचेवर डाग येणे, त्वचा काळी पडणे या गोष्टी खूपच सामान्य आहे. कडक उन्हाचे दिवस सुरू झाले आहेत. उन्हाळ्यात त्वचा रुक्ष आणि निस्तेज होते. यावेळात शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी आपण पाणी व थंड पेय पितो. पण या काळात त्वचा खूपच खराब होते. उन्हाळ्यात त्वचेला खूप हानी पोहोचते. त्वचा टॅन होते, यासह त्वचेवर मुरूम व काळपट डाग पडण्याची शक्यता निर्माण होते.या काळात अनेक जण त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक महागडे उत्पादने वापरतात. पण या काळात फळाचा वापर करून तुम्ही नितळ त्वचा मिळवू शकता.**

## कलिंगडाचा फेसपॅक

- चालू सिजनचे फळ म्हणजे कलिंगड. लालभडक कलिंगडामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, सोडियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम असते. यामुळे तुमची स्किन ग्लो होऊ शकते. कलिंगडामध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे त्वचेवर सुरकुत्या येत नाहीत. त्वचेवरील लाइकोपीन कायम राहते. कलिंगडामध्ये भरपूर पाणी असल्याने चेहरा आतून स्वच्छ होतो. यामुळे त्वचेला मॉइश्चरायझ होण्यास मदत होते. कलिंगडचा फेसपॅक लावल्याने चेहऱ्यावर सुरुकुत्या येत नाही.
- लागणारं साहित्य : कलिंगडाचा गर दोन ते तीन चमचे, मध एक चमचा, बेसन एक चमचा, हळद अर्धा टीस्पून.
- अशा पद्धतीने बनवा फेसपॅक : सर्वप्रथम एका भांड्यात कलिंगडाचा गर घ्या. त्याच्या बिया काढून टाका. कलिंगडाच्या गरामध्ये एक चमचा मध, चिमूटभर हळद, एक चमचा बेसन मिसळून पेस्ट तयार करा. आता हा मास्क चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटांनंतर, सामान्य पाण्याने आपली त्वचा धुवा. फेसपॅक काढल्यानंतर चेहरा मॉइश्चरायझ करा. यामुळे चेहरा ग्लो करेल.

## मास्क वापरण्यापूर्वी...

मास्क वापरण्यापूर्वी नेहमी तुमचा चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा. कधीही अस्वच्छ हातांनी मास्क बनवू नका. हा फेस मास्क वापरल्यानंतर तुम्हाला तुमचा चेहरा धुण्याची गरज नाही. आपला चेहरा धुतल्यानंतर कोरडेपणा टाळण्यासाठी आपला चेहरा पूर्णपणे मॉइश्चराइझ करा.



## कलिंगड आणि दह्याचा फेस मास्क

हा फेस मास्क तयार करण्यासाठी एक वाडगा घ्या. एक चमचा दही त्यात दोन चमचेकलिंगड रस आणि एक चमचा मध घाला. या मिश्रणाची पेस्ट तयार करा . एकदा ते चांगले मिसळले की, ही पेस्ट चेहऱ्याला लावा आणि 15 ते 20 मिनिटे कोरडे होऊ द्या, नंतर साध्या पाण्याने चेहरा स्वच्छ करा.

## कलिंगड आणि काकडी फेस मास्क

एका भांड्यात कलिंगडाचे दोन छोटे तुकडे मॅश करा. आता एक चमचा काकडी प्लममध्ये एक चमचा मुलतानी माती घाला. पेस्ट बनवण्यासाठी साहित्य चांगले मिसळा. हे मिश्रण चेहऱ्याला लावा आणि १५ ते २० मिनिटे तसेच राहू द्या. आपला चेहरा थंड पाण्याने धुवा. यामुळे चेहरा चमकण्यास मदत होईल.

## कलिंगड आणि कोरफड जेल

हा फेस मास्क बनवण्यासाठी एक चमचा कलिंगडचा गर आणि दोन चमचे कोरफड जेल मिक्स करा. ते चांगले मिसळा. एक गुळगुळीत, अगदी फेस मास्क तयार करण्यासाठी, एक चमचा ग्रीन टी पावडर घाला आणि सर्वकाही पूर्णपणे एकत्र करा. यामुळे चेहरा चमकण्यास मदत होईल.

# सतत चेहरा धुणेही नुकसानदायक

**चेहऱ्यावर धूळ - माती काढून टाकण्यासाठी आणि चेहरा नेहमी फ्रेश दिसण्यासाठी तसंच त्वचेची काळजी घेण्यासाठी काही जण सारखा चेहरा धुतात. यामुळे चेहऱ्यावर अधिक चमक येते असं काही जणांना वाटतं. मात्र असं अजिबात नाही. उलट सतत चेहरा धुतल्याने त्वचेवरील नैसर्गिक तेल निघून जाते आणि चेहरा अधिक खराब होतो. यामुळे त्वचेला हानी पोहचते. जास्तवेळा चेहरा धुतल्याने कोणत्या त्वचेच्या समस्यांना सामोरे जावे लागते जाणून घ्या.**

- यामुळे होते चेहऱ्याचे नुकसान : त्वचा आपल्या संरक्षणासाठी स्वतःच नैसर्गिक तेलाचे उत्पादन करत असते. जे त्वचेच्या सेल्ससाठी ल्युब्रिकंटप्रमाणे काम करते आणि त्वचेला अधिक तरूण आणि चमकदार राखण्यासाठी मदत करते. त्यासह नव्या सेल्स प्रॉडक्शनच्या मदतीसाठीदेखील उपयोगी ठरते. जेव्हा सतत चेहरा धुतल्याने त्वचेमधील नैसर्गिक तेल निघून जाते तेव्हा त्वचा कोरडी पडू लागते.
- त्वचेवर दिसतात फाईन लाईन्स : सतत चेहरा धुतल्याने त्वचेवर फाईन लाईन्स येऊ लागतात. ज्यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या दिसू लागतात. याचा परिणाम म्हणजे तरूण वयातच अनेक जण म्हातारे दिसू लागतात. त्यामुळे सतत चेहरा धुतल्याने तुम्ही तरूण राहाल असं वाटत असेल तर ते चुकीचे आहे.
- त्वचा होते सैलसर : बरेचदा चेहरा सतत धुतल्यामुळे डोळ्यांच्या आसपासची त्वचा ही सैलसर होते आणि वयापेक्षा अधिक मोठे दिसण्याचा धोका संभवतो. त्यामुळे त्वचेला तरूण ठेवायचे असेल तर ही गोष्ट करणे टाळा.
- त्वचेवरील कोरडेपणा वाढतो : सतत चेहरा धुताना साबण आणि फेसवॉशचा वापर केला जातो, ज्यामुळे त्वचेतील कोरडेपणा वाढतो आणि त्वचेवरील चमकदारपणा निघून जाऊन त्वचा निस्तेज दिसू लागते.
- पीएच बॅलेन्स ढासळतो : त्वचेचा PH Balance सतत चेहरा धुतल्यामुळे बिघडतो आणि त्यामुळे अनेक त्वचेच्या समस्यांना तुम्हाला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे चेहरा धुताना नक्की काळजी घ्या.

## केवळ दोन वेळा धुवा चेहरा

तुमची त्वचा कोरडी असो, तेलकट असो वा नॉर्मल असो, दिवसातून केवळ दोन वेळाच चेहरा धुवावा. यामुळे त्वचेतील नैसर्गिकपणा टिकून राहातो आणि त्वचा कोरडी होत नाही. तुमच्या त्वचेवर कोरडेपणा वाढत असेल तर तुम्ही चेहऱ्यावर साबणापेक्षा दही आणि मधाचा वापर करावा. रोज दोन चमचे दही आणि अर्धा चमचा मध मिक्स करून चेहऱ्याला मसाज केल्यास, चेहऱ्याचा ताजेपणा टिकून राहतो. आता चेहरा धुताना या गोष्टींची काळजी घ्या आणि त्वचेची काळजी घेत त्वचा ठेवा अधिक चमकदार आणि तरुण!



# ब्लाईंड पिंपल्स!

**महिलांनाच नाही तर अगदी पुरुषांनाही Pimples अर्थात मुरूमांचा त्रास होतो. मात्र तुम्हाला ब्लाईंड पिंपल्स माहीत आहेत का ? हो असाही प्रकार असतो. त्वचेच्या आतील भागामध्ये ब्लाईंड पिंपल्स निर्माण होतात जे लांबून दिसत नाहीत. मात्र तुम्ही चेहऱ्यावर बोटं फिरवल्यास तुम्हाला हे ब्लाईंड पिंपल्स जाणवतात. व्हाईटहेड्स अथवा ब्लॅकहेड्सच्या खाली हे ब्लाईंड पिंपल्स असतात. याचा त्रास म्हणजे यामुळे त्वचा खराब होते आणि निस्तेज होते. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करणं हे तुमच्या त्वचेसाठी घातक ठरू शकते. यासाठी अनेक घरगुती उपाय आहेत, जे केल्याने Blind Pimples नीट होऊ शकतात.**

### कधीही हे पिंपल्स दाबू नका

ही मुरूमं त्वचेच्या वरच्या भागात दिसून येत नाहीत. त्यामुळे व्हाईटहेड्सप्रमाणे तुम्ही हे बोटाच्या मदतीने फोडणे चुकीचे ठरू शकते. तुम्ही असं केल्यास तुमच्या त्वचेवर कायमचा डाग येऊ शकतो, तसंच यामुळे दुखापतही होऊ शकते आणि इन्फेक्शन होऊन त्रास होतो. त्यामुळे हे पिंपल्स तुम्ही दाबून फोडू नका.

### Warm Compress चा वापर करा

वॉर्म कंप्रेसचा उपयोग करून तुम्ही हे पिंपल्स बरे करू शकता. सर्वात पहिले तुम्ही एक स्वच्छ कपडा गरम (कोमट) पाण्यात बुडवा आणि मग साधारण १०-१५ मिनिट्स ब्लाईंड पिंपल असणाऱ्या ठिकाणी ठेवा. यानंतर कपडा काढा आणि चेहरा स्वच्छ करून घ्या.

### पिंपल स्टिकरचा करा वापर

हा एक लहानसा स्टिकर असून पिंपल आलेल्या ठिकाणी चेहऱ्यावर चिकटवला जातो. या स्टिकरमध्ये सॅलिसिलिक ॲसिड नावाचा घटक असतो. हा स्टिकर तुमच्या त्वचा आणि ॲक्नेमधून अतिरिक्त तेल, सीबम शोषून घेतो आणि Inflammation कमी करण्यास मदत करतो. मात्र याचा २४ तासापेक्षा अधिक काळ उपयोग करू नका.

### टी ट्री ऑईलचा उपयोग

टी ट्री ऑईलमध्ये अँटीबॅक्टेरियल गुण असून मुरूमांमुळे होणाऱ्या बॅक्टेरियाचा नायनाट करण्यास मदत करतात. हे लहान अथवा मोठ्या कोणत्याही प्रकारच्या मुरूमांवर उपयोगी ठरते. याचा प्रयोग तुम्ही कोणत्याही फेशियल ऑईलमध्ये मिक्स करून करू शकता. दिवसातून दोन वेळाच तुम्ही याचा उपयोग करावा.

### बर्फाचा प्रयोग

सर्वात पहिल्यांदा तुम्ही चेहऱ्यावर माईल्ड फेसवॉशचा प्रयोग करून चेहरा स्वच्छ करून घ्यावा. त्यानंतर टॉवेलने हलक्या हाताने चेहरा स्वच्छ करा आणि बॅगमध्ये बर्फाचे तुकडे घेऊन अथवा हलक्या कपड्यात बर्फ घेऊन पिंपल्स आलेल्या ठिकाणी लावा. हा Ice Pack साधारण ५ मिनिट्स तुम्ही ॲक्ने असणाऱ्या ठिकाणी ठेवा आणि मग काढा. दिवसातून ३-४ वेळा केल्यास पिंपल्सपासून सुटका मिळते. टीप - तुम्हालाही ब्लाईंट पिंपल्सचा त्रास असेल तर हे प्रयोग नक्की करून पाहा. कोणतीही गोष्ट करण्याआधी पॅच टेस्ट करा आणि आपल्या ब्युटिशियनचा सल्ला विचारात घ्या.



# तेरे नैना! भुवया अन् पापण्यांच्या केस गळतीवर अशी करा मात

**पापण्या आणि भुवया दोन्ही डोळ्यांचा आकार ठरवतात. जर आपल्या भुवया दाट असतील तर आपल्या चेहऱ्याचे फीचर्स स्पष्टपणे दिसतात. अशा परिस्थितीत जर तुमच्या भुवया आणि पापण्यांचे केस काही कारणाने गळू लागले तर चेहऱ्याचे सौंदर्यंवर त्याचा परिणाम होतो. या समस्येवर बाजारात अनेक उत्पादने मिळतात पण जर तुम्ही घरगुती पद्धतीचा विचार करत असाल तर या ५ पद्धतीने तुम्ही या समस्येवर मात करू शकता...**



- कोरफड : कोरफडीच्या जेलमध्ये ॲलोनिन नावाचे तत्व असते. हा घटक केसांच्या वाढीस मदत करतो. यासोबतच कोरफडीच्या जेलमध्ये व्हिटॅमिन ए, सी, ई असते यामुळे शरीरातील पेशी चांगल्या प्रकारे काम करतात आणि चेहऱ्याला चमक येते. कोरफडीच्या जेल सोबत तुम्ही ऑलिव्ह ऑईल देखील मिक्स करु शकता. रात्री झोपताना हे मिश्रण भुवया आणि पापण्यांना लावण्याने केस वाढण्यास मदत होते.
- कोरफड आणि एरंडेल तेल : कोरफड आणि एरंडेल तेलाच्या मिश्रणाने देखील केसांची चांगल्या प्रकारे वाढ होते. त्यामुळे रात्री एक टीस्पून कोरफडीच्या रसामध्ये ३ ते ४ थेंब एरंडेल तेल टाकून मलिश केल्याने केस वाढण्यास मदत होते. हे मिश्रण मस्करा ब्रशच्या मदतीने भुवया आणि पापण्यांवर लावा. रात्रभर राहू द्या. या उपायाचा फरक तुम्हाला आठवड्याभरातच जाणून घेतो.
- कोरफड आणि गुलाब पाणी : कोरफडाचा गर आणि गुलाब पाणी या गोष्टी प्रत्येकाच्या घरात असतात. या दोन गोष्टीचे मिश्रण चेहऱ्याला लावल्याने केस वाढण्यास मदत होते. हे मिश्रण तुम्ही रात्रभर चेहऱ्यावर ठेवू शकता किंवा १५ ते २० मिनिटे डोळ्यांवर ठेवू शकता.
- ऑलिव्ह ऑइल : रोज रात्री झोपण्यापूर्वी भुवयांना फक्त ऑलिव्ह ऑइल लावल्याने देखील खूप फायदा होत . बोटांच्या मदतीनं ऑलिव्ह ऑइल भुवयांना लावून हलक्या हातानं पाच ते दहा मिनिटांसाठी मसाज करावा. तुम्हाला १५ दिवसातच भुवयांमध्ये फरक जाणवेल.
- नारळाचे तेल : नारळाचे तेल हा केस वाढवण्यासाठी सर्वात स्वस्त आणि मस्त उपाय आहे . नारळाच्या तेलात व्हिटॅमिन ई आणि फॅटीॲसिड असतात. यामुळे केस वाढण्यास मदत होते. या उपायासाठी तुम्ही घाण्यावरचे तेलाचा वापर केलात तर परिणाम लवकर दिसून येईल.

## शॉर्ट न्यूज

### पत्नीच्या खून प्रकरणी पतीला जन्मठेपेची शिक्षा

**श्रीगोंदा :** दारूच्या नशेत पत्नीला मारहाण करत पत्नीचा खून केल्याप्रकरणी आरोपी पती रोहिदास भिकाजी पंधरकर (वय ६५, रा. पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदे) याला श्रीगोंदा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश मुजीब शेख यांनी भादवि कलम ३०२ अन्वये जन्मठेपेची शिक्षा तसेच ३ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सरकारी वकील पुषा कापसे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीला भादवि कलम ३०२ अन्वये जन्मठेपेची शिक्षा तसेच ३ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून आशा खामकर व सुजाता जयवंत गायकवाड यांनी सहकार्य केले.

### सोशल मीडियावर डॉ. विखे यांची बदनामी

**नगर :** लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांची बदनामी करणारी पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निलेश लंके प्रतिष्ठान पाथर्डी या व्हॉट्सप ग्रुपमधील लोकनेते सोशल मीडिया नावाने असलेल्या एका मोबाईलनंबर धारक अनोळखी व्यक्तीविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### कोल्हार उपबाजारात गहू २६५० रुपये क्विंटल

**राहाता :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक उपबाजारात गव्हाची १६ किंटल आवक झाली. गहू कमीत कमी २४१६ रुपये तर जास्तीत जास्त २६५० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २५५० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच उपबजारात सोयाबीनची २२ क्विंटल आवक झाली. सोयाबीन कमीत कमी ४५१६ रुपये तर जास्तीत जास्त ४५४१ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. सोयाबीन सरासरी ४५३० रुपये प्रती किंटल दराने खरेदी करण्यात आली.

### शहरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

**श्रीरामपूर :** शहर व परिसरात सध्या मोकाट आणि भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला आहे. या भटक्या कुत्र्यांनी ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी नगरपालिकेने लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहरात वृध्द माणसे, शाळेत जाणारे विद्यार्थी यांच्यासह नागरिकांना आपला जीव मुठीत धरुन चालावे लागत आहे. मागील काही महिन्यांमध्ये तालुक्यातील एकलहरे भागात एका कुत्र्याने चिमुरडीला चावा घेतला होता.

### छत्रपती संभाजीराजेंची जयंती साजरी

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर येथे छत्रपती संभाजीराजे जयंती मराठा सुकाना समितीच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे म्हणाले की छत्रपती संभाजीराजे एक धर्मवीर व स्वतः स्वतंत्र एक राजे होते. स्वराज्यासाठी छत्रपती संभाजीराजांचे मोठा योगदान आहे. गोरगरिबांसाठी राजे सर्वांसाठी होते, एकएक राजा होते. असे गणेश झगरे म्हणले. यावेळी तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगणे, पोलीस पाटील अनिल लहारे, दीपक शिंदे, दीपक कडू, महेश कांगणे, दीपक बर्डे, मनोज झगरे, आजिनाथ झगरे, शिवभक्त भक्तपुर ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिक्षक व पदवीधर विधानपरिषद निवडणूक पुढे ढकलली

## निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

**शिक्षक आमदारकीची निवडणूक १० जूनला जाहीर झाल्यामुळे लोकसभेची निवडणूक ड्यूटी आटोपून सुट्टीवर जाणाऱ्या शिक्षकांच्या आनंदावर विरजण पडलं होतं. मात्र आता निवडणूक आयोगाने शिक्षक व पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.**



शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष किसन मोरे यांनी आमदार कपिल पाटील यांच्यासोबत दिल्लीत जाऊन भारत निर्वाचन आयोगाकडे मागणी केली होती तर हायकोर्टात याचिकाही केली होती. भारत निर्वाचन आयोगाने याबाबतची प्रेस नोट जारी केली आहे.

**चार मतदारसंघासाठी जाहीर झाली होती निवडणूक**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर, तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. या चार जागांसाठी येत्या १० जून रोजी मतदान होणार होते, तर १३ जूनला मतमोजणी केली जाणार होती. त्यामुळे हजारो शिक्षक मतदानापासून वंचित राहणार होते. त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षकांचा मताधिकार सुरक्षित केल्याबद्दल सुभाष किसन मोरे यांचे आमदार कपिल पाटील आणि शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांनी अभिनंदन केले.

**अनिश्चित काळासाठी निवडणूक पुढे ढकलली**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने २ मे ते १४ जूनपर्यंत सुट्टीचा कालावधी जाहीर केला असून शाळा १५ जून नंतर सुरु होणार आहेत. तसेच १७ जून ते २० जून पर्यंत बकरी ईद निमित्त उर्दू माध्यमांच्या शाळांना सुट्टी असते. मुंबईतील शिक्षक पदवीधर मतदार संघातील उत्तर भारतीय शिक्षक टिचर्स स्पेशल ट्रेनने ११ जून २०२४ रोजी मुंबईत परतणार आहेत. तसेच महाराष्ट्रातील अनेक शिक्षक सुट्टी कालावधीत मूळ गावी किंवा कुटुंबासह पर्यटनासाठी बाहेरगावी गेले आहेत. उपरोक्त सर्व बाबींचा उल्लेख शिक्षक भारतीच्यावतीने निवडणूक आयोग आणि हायकोर्टात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत केला होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने अनिश्चित काळासाठी ही निवडणूक पुढे ढकलली आहे

# राष्ट्रवादी कुणाची?:सुनावणी २ महिने लांबली

## १६ जुलैला सुनावणी सुरू होणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांची की अजित पवारांची, या बाबतची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी दोन महिने पुढे गेली आहे. आता १६ जुलैला ही सुनावणी सुरू होणार असून, त्यानंतरच पक्षाचे नाव आणि घड्याळ या चिन्हाबाबतचा निर्णय होण्याची शक्यता आहे. १८ मे ते ७ जुलै या काळात न्यायालयास उन्हाळी सुटी असल्याने आता त्यानंतरची तारीख देण्यात आली आहे.**

राष्ट्रवादीचे नाव व चिन्ह अजित पवार गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. १९ मार्चला त्यावरील सुनावणीदरम्यान कोर्टाने अजित पवारांना नोटीस जारी करून चार आठवड्यांत या याचिकेबाबत उत्तर मागवले होते. त्यानंतर



या उत्तराबाबत शरद पवारांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली होती. मात्र, या कालावधीत अजित पवारांचे उत्तर व शरद पवारांचे त्यावरील म्हणणे सादर झाले नाही. दरम्यान, या प्रकरणी मंगळवारी (दि. १४) सुनावणी ठेवण्यात आली होती. न्या. विश्वनाथन आणि न्या. सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर ४४ व्या क्रमांकावर हे प्रकरण होते.

(पान १वरून)

## अजित पवारांनी व्यक्त केली होती प्रदेशाध्यक्षपदाची इच्छा

पदाबाबत इच्छा व्यक्त केली होती. यासंदर्भात बोलताना जयंत पाटील यांनी गौप्यस्फोट केला आहे. ''अजित पवार अजून पाच ते सहा दिवस थांबले असते तर शरद पवार त्यांची इच्छा पूर्ण करणार होते, असं जयंत पाटील म्हणाले. ते एपीबी माझा वृत्तवाहिनीच्या एका कार्यक्रमात बोलत होते.

**जयंत पाटील काय म्हणाले?**

राष्ट्रवादीमध्ये फूट पडण्याआधी प्रदेशाध्यक्ष पदाबाबत अजित पवारांनी इच्छा व्यक्त केली होती. यावर बोलताना जयंत पाटील म्हणाले, ''अजित पवार यांच्या राजकीय महत्वाकांक्षाची भाजपाबरोबर जाऊन प्रगती झालेली नाही. मात्र, त्यांची प्रतिमा खराब होईल हे त्यांना माहिती असावं. तरीही त्यांना ते पाऊल उचलावं लागलं. त्यामुळे यामध्येच सर्वकाही आलं. आता प्रश्न राहिला माझ्यात आणि त्यांच्यात सुप्त राजकारण असं काही नव्हतं'', असं जयंत पाटील यांनी सांगितलं.

राष्ट्रवादीच्या मुंबईतील मेळाव्यात अजित पवारांनी प्रदेशाध्यक्ष पदाबाबत बोलताना सांगितलं होतं की, पाच वर्ष झाली आहेत. यापुढे आम्हालाही संधी मिळावी. त्यांनी इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर आणखी पाच ते सहा दिवस अजित पवार थांबले असते तर शरद पवार त्यांची ती इच्छाही पूर्ण करणार होते, अशी माझी माहिती आहे. मात्र, पक्षाच्या मान किंवा महत्वाकांक्षाची प्रश्न नव्हता. तिकडे पंतप्रधानांनी भोपाळमध्ये ७० हजार कोटींच्या घोटाळ्याबाबत भाष्य केलं आणि इकडे या सर्वांनी भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय़ घेतला'', असं जयंत पाटील म्हणाले.

**शरद पवारांना पुत्री प्रेम आहे का?**

''शरद पवार यांचे पुत्री प्रेम तर आम्हाला अजिबातच अनुभवायला आले नाही. कारण तीन टर्म खासदार असलेल्या मुलीला कधीही मंत्रीपद देण्यात आले नाही. मुलीला मंत्रीपद दिले असते तर बरेच प्रसंग टळले असते. सरकार असताना शरद पवार यांनी दुसऱ्या खासदारांना संधी दिली. हे जगजाहीर आहे. त्यामुळे पुत्रीप्रेमाचा आरोप होण्याचा प्रश्नच येत नाही'', असे जयंत पाटील म्हणाले.

# स्मार्ट पुणेकरांना सायबर चोरट्यांचा ठेंगा !

## सव्वादोन वर्षांत २५० कोटींवर डल्ला, १२०० गुन्हे दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

**शिक्षणाचे माहेरघर आणि आयटी हब अशी ओळख असलेल्या पुण्यात सायबर गुन्ह्यांनी हातपाय पसरले असून, गेल्या सव्वादोन वर्षांत पुणेकरांच्या अडीचशे कोटी रुपयांवर सायबर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. या गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांना प्रशिक्षित मनुष्यबळापासून प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव आदी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गुन्ह्यांचा छडा लावण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे चित्र आहे.**



**ऑनलाइन व्यवहार चोरट्यांच्या पथ्यावर**

ऑनलाइन आर्थिक व्यवहारांचे प्रमाण वाढले असून, हीच बाब सायबर चोरट्यांच्या पथ्यावर पडली आहे. गेल्या सव्वादोन वर्षांत एकट्या पुणे शहरात एक हजार १८९ सायबर गुन्हे दाखल झाले आहेत. सायबर चोरटे प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुणी, नोकरदार तरुण, नोकरीच्या शोधातील तरुण यांना 'टार्गेट' करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये टास्क फ्रॉड, अर्धवेळ नोकरी, पार्सलमध्ये अमली पदार्थ सापडल्याचे सांगून फसवणूक, चिटिंग फ्रॉड, ऑनलाइन बिझनेस फ्रॉड, नोकरी, लग्न, गिफ्ट, सोशल मीडियाचे गुन्हे, हॅकिंग, डेटाचोरी, डेबिट, क्रेडिट कार्डांशी संबंधित आणि मोबाइलचे गुन्हे यासह अनेक विविध गुन्ह्यांचा समावेश आहे.

गंभीर गुन्ह्यांनाही टाकले मागे

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत शहरात वर्षभरात साधारणत: १२ हजार गंभीर गुन्हे दाखल होतात. गेल्या तीन वर्षांत सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून, वर्षभरात २० हजारांहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत.

गुन्ह्यांची संख्या आणि लांबवलेली रक्कम

वर्ष एकूण गुन्हे लांबवलेली रक्कम ()

२०२२ ३५७ ६७ कोटी ८८ लाख

२०२३ ४८७ ७७ कोटी ४७ लाख

२०२४ ३४५ १०८ कोटी ९३ लाख

एकूण गुन्हे ११८९ २५४ कोटी २९ लाख

'ई-ऑफिस'मुळे तपासाला गती?

वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर पोलिस ठाण्यांचे कामकाज आता लवकरच 'ई-ऑफिस'प्रमाणे राबविण्यात येणार आहे. दाखल होणाऱ्या तक्रारींच्या वर्गीकरणापासून ते प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी कार्यपद्धती तयार करण्यात येणार आहे. कोणत्या तपास अधिकाऱ्याकडे किती गुन्हे तपासासाठी आहेत, त्यांनी किती दिवसांत गुन्ह्यांचा तपास करणे अपेक्षित आहे, या बाबींचा त्यात समावेश असेल. याशिवाय एका क्लिकवर उपायुक्तांपासून पोलिस आयुक्तांपर्यंत सर्वांना ही माहिती दिसणार आहे. त्यामुळे सायबर गुन्ह्यांच्या तपासाला गती मिळण्याची शक्यता आहे.

दीडशे पोलिसांना विशेष प्रशिक्षण

सायबर पोलिस ठाण्यांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळावे म्हणून दीडशे अधिकारी, कर्मचाऱ्यांची 'बेंचमार्क टेस्ट' घेण्यात येणार आहे. त्यामध्ये पोलिस ठाणे आणि सायबर पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार-अधिकाऱ्यांचा समावेश असेल. चाचणीच्या माध्यमातून तपासाधिकाऱ्यांतील कौशल्याचा अंदाज येण्यास मदत होईल. त्यानंतर निवड झालेल्यांना सायबर प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

तपास प्रभावी होण्यासाठी...

- तक्रारदार सायबर पोलिस ठाण्यात गेल्यानंतर टोकन आयडी देऊन तक्रारींचे वर्गीकरण करणार.

-










# अपघातग्रस्त तरूणाला आ. लंके यांनी दिला आधार

## पुण्याच्या कोंढव्यातील घटना

**पारनेर : प्रतिनिधी**

**बुधवारी सकाळी दुचाकीवरून कामावर निघालेल्या तरूणाची दुचाकी अपघातग्रस्त होउन तो रस्त्यावर पडला. त्याच वेळी तेथून जाणाऱ्या आ. नीलेश लंके यांच्या ही गोष्ट निदर्शनास आली. लंके यांनी तात्काळ वाहन थांबवून त्या तरूणास पिण्यासाठी पाणी दिले. त्याची विचारपूस करीत आधारही दिला.**

बुधवारी सकाळीच आ. लंके हे त्यांच्या हंगे येथील निवासस्थानावरून पुणे येथे एका दशक्रिया विधीसाठी गेले होते. कोंढवा भागात लंके यांचे वाहन असताना कामावर निघालेल्या एका तरूणाची दुचाकी अपघातग्रस्त झाली. लंके यांनी वाहन थांबवून तरूणास उठवून त्यास पिण्यासाठी पाणी दिले. त्याची पडलेली दुचाकी सहकाऱ्यांना उभी करण्याच्या सुचना देत लंके यांनी या तरूणाची आस्थेवाईकपणे चौकशी केली. चक्कर आल्याने ते पडल्याचे समजल्यानंतर लंके यांनी त्यास औषधोपचार करण्याचा सल्ला दिला. काही अडचण आल्यास निःसंकोच संपर्क करण्याचे सांगण्यासही लंके हे विसरले नाहीत.



**कोंढवा पुणे येथे दुचाकीवरून पडलेल्या तरूणास धीर देत आ. नीलेश लंके यांनी त्याची आस्थेवाईकपणे चौकशी केली.**

दि. १३ मे रोजी मतदार झाल्यानंतर एक दिवसही विश्रांती न घेता आ. लंके यांनी दि.१४ मे पासून आपल्या कामास पुन्हा सुरूवात केली. मंगळवारी ते पाथर्डी दौऱ्यावर होते. रात्री तेथून परतल्यानंतर तालुक्यातील विविध कामांचा आढावा घेऊन लंके हे बुधवारी सकाळी पुण्याला दशक्रिया विधीसाठी रवाना झाले.

पुण्याहून नगरला येत लंके यांनी कांदा तसेच दुधाच्या दराबाबत जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांना निवेदन सादर केले. दि. १५ रोजी या प्रश्नावर रस्ता रोको करण्याची घोषणा लंके यांनी प्रचारादरम्यान केली होती. परंतू मतदानानंतरही आदर्श आचारसंहिता लागू असल्याने आंदोलन करता येणार नसल्याने लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून शासनाचे लक्ष वेधणार आहेत.

# मतमोजणी अगोदरच फटाके आणि बॅनरबाजी!

## लंके समर्थकांना विजयाचा आत्मविश्वास

**पारनेर : प्रतिनिधी**

**नगर दक्षिण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूकीचे मतदान पार पडल्यानंतर मतदारसंघातील बहुतांश तालुक्यांमध्ये तसेच नगर शहरात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येऊन अनेक ठिकाणी खासदार मिळायचा नाय लंके साहेबांसारखा अशा आशयांचे बॅनरही झळकले आहेत. मतमोजणी आगोदरच कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या या आत्मविश्वासाची मतदारसंघात चर्चा होत आहे.**

मतदान प्रक्रिया सुरू असताना महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके हे नगर शहरातच होते. विविध बुथवर जाउन त्यांनी मतदान प्रक्रियेची पाहणीही केली. स्टेट बँक चौकात मतदारांच्या बोटाला शाई लाऊन त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रकार लंके यांनीच उघडकीस आणला. याप्रकरणी गुन्हाही दाखल झाला आहे.

दरम्यान, मतदारसंघात अनेक ठिकाणी सायंकाळी सहा वाजल्यानंतरही मतदारांच्या रांगा लागल्याने उशिरापर्यंत मतदान सुरू होते. सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास आ. लंके हे त्यांच्या नगर येथील संपर्क कार्यालयात पोहचले त्यावेळी कार्यकर्त्यांनी त्यांचे फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोषात स्वागत केले. विविध तालुक्यांमध्ये तसेच नगर शहरात झालेल्या मतदानाचा कौल पाहता महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके हे मोठया मताधिक्क्याने विजयी होतील असा विश्वास व्यक्त करीत नगरसह विविध तालुक्यात कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा केला. अनेक ठिकाणी बॅनरबाजीही करण्यात आली.




**लोकसभा निवडणूकीच्या मतदानानंतर मतमोजणी आगोदरच गावागावांमध्ये फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. उत्साही कार्यकर्त्यांनी बॅनरबाजी करीत आ. लंके यांना शुभेच्छाही दिल्या आहेत.**

सुपे येथे बैठकीचे आयोजन करून आ. नीलेश लंके यांनी कार्यकर्त्यांची मने जाणून घेत आपल्या आमदारकीचा राजीनामा देत शरद पवार गटाकडून लोकसभेची निवडणूक लढविण्याचे रणशिंग फुंकले. अतिशय भावनिक झालेल्या या बैठकीत आ. लंके यांनी प्रथमच कमसे कम दो लाख असा नारा देत या निवडणूकीत आपणच विजयी होणार असा आत्मविश्वास व्यक्त केला होता.

सुप्यातील बैठकीनंतर आ. लंके यांनी जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. आ. लंके यांनी कोरोना काळात केलेल्या कामाची माहीती देणारी पुस्तिका घरोघर पोहचली. जनसंवाद यात्रा जसजशी पुढे जात होती, तसतसा आ. लंके यांना मिळणारा प्रतिसाद वाढत होता. लंके यांचे कार्य पाहून प्रभावित झालेला सर्वसामान्य मतदार स्वतः पुढे आला. जणूकाही सर्वसामान्यांनीच ही निवडणूक हाती घेतल्याचे चित्र मतदार संघात पहावयास मिळाले. लंके यांच्या जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी सुमारे दोन महिने रात्रंदिवस प्रामाणिक परीश्रम घेत घरोघर आ. लंके यांची तुतारी पोहचविण्याचे काम केले. याच कामातून आलेल्या आत्मविश्वासातून लंके समर्थकांनी मतदानानंतर फटाक्यांची आतिषबाजी करीत, बॅनरबाजी करीत लंके यांच्या विजयाचा दावा केला आहे.

# स्पर्धेच्या युगात भाषण कौशल्य आत्मसात करण्याची गरज

## शिवव्याख्याते प्रा.तुषार ठुबे यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिपादन**

**विद्यार्थ्यांचा बुध्यांक चांगला असून आजच्या स्पर्धेच्या युगात भाषन कौशल्य आत्मसात करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते व आदर्श शिक्षक तुषार ठुबे यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथील स्कॉलर सायन्स अँड मॅथ्स अकॅडमी आयोजित भाषन कला व नेतृत्व विकास या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रा. सचिन लंके, कुणाल तुपे,प्रा. मोनिका लंके, महेश ढुमणे, अक्षय खराडे व पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्कॉलर सायन्स अँड मॅथ्स अकॅडमी या नुकत्याच सुरू केलेल्या या शैक्षणिक संस्थेला पहिल्याच वर्षी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून गुणवंत शिक्षक या ठिकाणी असल्याने पुढील काळात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळणार आहे. प्रा तुषार ठुबे यांनी सांगितले की या ठिकाणी प्रा. सचिन लंके प्रा. मोनिका लंके व कुणाल तुपे यांना शैक्षणिक अनुभव मोठा असल्याने व संपर्क चांगला असल्याने ही शैक्षणिक संस्था भविष्यात चांगले काम करणार आहे. आजच्या विद्यार्थ्यांचा बुध्यांक चांगला असल्याने शिक्षकांपुढे सुद्धा एक चांगले शिक्षण देण्याचे आव्हान उभे आहे.

मोबाईल,टि व्ही, इंटरनेट हे आजच्या विद्यार्थ्यांना अल्पवयात उपलब्ध झाल्याने शैक्षणिक संधी मिळाली आहे याचा फायदा शिक्षणात घेण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. पारनेर तालुका हा गुणवंतांचा तालुका म्हणून राज्यात प्रसिध्द आहे. निघोज हा परिसर गेली दहा ते पंधरा वर्षांपासून शैक्षणिक दृष्ट्या समृध्द झाला आहे. अशाप्रकारे शैक्षणिक संधीचा लाभ घेणे ही काळाची गरज आहे. मात्र शैक्षणिक क्षेत्रात प्रगत होताना भाषन कौशल्य प्राप्त करुण स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी पुढे जाण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

प्रा.सचिन लंके यांनी यावेळी स्कॉलर सायन्स अँड मॅथ्स अकॅडमीचा उद्देश सांगितला पालकांनी मोठ्या प्रमाणात मागणी केल्याने ही शैक्षणिक संस्था काढण्याचा प्रयत्न केला मात्र गेली महिनाभरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून गुणवंत प्राध्यापकाचे विचार काय आहेत याची जाण विद्यार्थ्यांना झाली पाहिजे यातूनच सामान्य ज्ञान मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी प्रा. ठुबे यांचा सत्कार महेश ढुमणे व अक्षय खराडे यांच्या हस्ते करण्यात आला. कुणाल तुपे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शेवटी प्रा. मोनिका लंके यांनी आभार मानले.

# हिवरे बाजार देशातले उत्कृष्ट सुंदर गाव!

## लेफ्टनंट कर्नल सीनम तांबी यांचे गौरोद्गार



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**हिवरे बाजारबद्दल मी ऐकून होतो या आदर्श गावाला भेट देण्याची इच्छा बरेच दिवस मनात रेंगाळत होती तो योग आज जुळून आला.याचा मला अतिशय आनंद होत आहे.हिवरे बाजारमधील स्वच्छता आणि शुद्ध पाणी पुरवठ्याचे नियोजन व्यवस्थापन एखाद्या नगरापेक्षाही अधिक उत्कृष्ट आहे.**

हिवरे बाजारमधील घरे, सार्वजनिक इमारती , रस्ते , शौचालय, कृषीविकास, सामाजिक शिस्त हे सार काही सुंदर व नाविन्यपूर्ण आहे.भर मे महिन्यात प्रखर उन्हाळ्यात एक हात मारताच बोअरवेलमधून पिण्याचे पाणी बाहेर पडणे हा अल्प पाऊस पडूनही हा मला एक चमत्कार वाटला.

पाण्याचा प्रत्येक थेंब हिवरे बाजार करांनी वाया न घालवता जपला म्हणून हे घडले.हिवरे बाजारमधील सुंदर काम सर्व भारतीयांसाठी प्रेरणादायी आहे.याचे श्रेय पद्मश्री पोपटराव पवारांना व गावकऱ्यांना देतो.हिवरे बाजारची भेट अविस्मरणीय आहे असे मत आर्मी मेडिकल कोअर ग्रुपचे लेफ्टनंट कर्नल सीनम तांबी यांनी हिवरे बाजारच्या भेटीत सांगितले.पद्मश्री पोपटराव पवार यांनी संपूर्ण विकास कामांची माहिती दिली आणि स्वागत केले.

# उमेदवारांचा खर्च दणक्यात !

## विखेंचा ५४ लाख, तर लंकेंचा ३१ लाख खर्च

**नगर : प्रतिनिधी**

**नगर, शिर्डी लोकसभा मतदार संघासाठी सोमवारी (ता. १३) रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यापूर्वी ४८ तास अगोदर प्रचाराच्या तोफा थंडावल्या होत्या. उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून प्रचारासाठी किती खर्च केला. याची आकडेवारी निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. त्यानुसार महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील व सदाशिव लोखंडे यांनी सर्वाधिक खर्च केल्याचे दिसून येते.**

नगर लोकसभा मतदारसंघातील सुजय विखे पाटील यांनी ५४ लाख ६० हजार रुपये खर्च केल्याचे सादर केले आहे. त्यांनी सादर केलेल्या खर्चात ८४ हजारांची तफावत आली होती. नीलेश लंके यांनी ३१ लाख रुपये खर्च केल्याची माहिती दिली आहे, तर यात एक लाख ६५ हजारांची तफावत दिसून आली.



दुसरीकडे शिर्डी मतदारसंघात सदाशिव लोखंडे यांनी ५४ लाख रुपये खर्च केल्याचे सादर केले. यामध्ये निवडणूक विभागाला २९ लाख २१ हजार रुपयांची तफावत दिसून आली होती. भाऊसाहेब वाकचौरे यांनी ३२ लाख २४ हजार रुपये खर्च केल्याचे दिसून येते आहे. तर त्यांच्या खर्चात ५ लाख १९ हजार रुपयांची तफावत आली. लोकसभा निवडणुकीत उमेदवारांना खर्च करण्यासाठी ९५ लाखांची मर्यादा निवडणूक आयोगाने घालून दिली आहे. उमेदवारांच्या प्रचार, सभा, रॅलीवर निवडणूक विभागाचे लक्ष होते. उमेदवाराच्या खर्चाची तपासणी करण्यासाठी ३, ७ आणि ११ मे असे तीन दिवस ठरवून देण्यात आले होते. या दिवशी उमेदवारांना खर्च सादर करणे बंधनकारक होते.


# आठवणीतील शेवगाव ग्रंथाचे १८ मे ला प्रकाशन

## सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

**शेवगाव : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्या,सिद्धहस्त लेखिका डॉ .मेधाताई कांबळे लिखित आठवणीतील शेवगाव या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक १८ मे ला सकाळी साडेदहाला होत आहे .**

शेवगाव येथील येथील मिरी मार्गे नगर रस्त्यावरील ममता लॉन्स येथे हा शानदार सोहळा तालुक्याचे भूमिपुत्र ,सेवानिवृत्त आयुक्त डॉ.पुरुषोत्तम भापकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध साहित्यिक,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. सदानंद मोरे यांचे हस्ते शेकडो निराधार मनोरूग्णांना आधार देऊन त्यांचा सांभाळ करणाऱ्या देहरे येथील माऊली प्रतिष्ठानचे प्रवर्तक डॉ.राजेंद्र धामणे तसेच प्रसिद्ध साहित्यिक डॉ कैलास दौंड आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.




या सोहळ्यास उपस्थित राहावे,असे आवाहन सोहळ्याचे संयोजक असिस्टंट कमांडंट नरेंद्र गच्ची यांनी केले आहे .

# जिल्ह्यात ३१२ टँकरद्वारे पाणीपुरवठा

## ग्रामीण भागातही पाण्याचे उद्भव कोरडे

**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात दिवसेंदिवस टंचाईच्या झळा वाढत आहे. तहानलेल्या लोकांना पाणीपुरवठा करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. सध्या जिल्ह्यात ३१२ टँकरने २९१ गावे व १५४४ वाडी-वस्तीवरील पाच लाख ७० हजार लोकांना पाणीपुरवठा सुरू आहे.**

ग्रामीण भागात पाण्याचे उद्भव कोरडे पडू लागल्याने दिवसेंदिवस टँकरच्या मागणीत वाढ होत आहे. आज अखेर जिल्ह्यात ३१२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सर्वाधिक टँकर पाथर्डी तालुक्यात सुरू आहे. पाथर्डी, कर्जत, पारनेर, श्रीगोंदे व शेवगाव या पाच नगरपालिकेत २७ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. याशिवाय जिल्ह्यात सध्या संगमनेर तालुक्यात २७ टँकर, अकोले ५, कोपरगाव ३, नेवासे ३, पारनेर ३४, नगर २९, पाथर्डी ९९, शेवगाव ११, कर्जत ४२, जामखेड २३, श्रीगोंदे ९, अशा एकूण ३१२ टँकरने जिल्ह्यात पाणीपुरवठा सुरू आहे.



# ताराबाई सैद हृदयविकाराने यांचे निधन

## वासुंद्याचे सरपंच भाऊसाहेब सैद यांना मातृशोक

**वासुंदे : प्रतिनिधी**

**मातोश्री ताराबाई अहिलाजी सैद यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सोमवार दि.१३ मे रोजी निधन वासुंदे शिक्री येथे निधन झाले. वासुंदे गावचे विद्यमान सरपंच भाऊसाहेब सहित यांच्या त्या मातोश्री होत.**

मातोश्री ताराबाई सैद यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संसार फुलवला होता. वयाच्या पंचविशीत असताना पतीचे निधन झाले. त्यावेळी मोठी मुलगी पाच वर्षांची लहान मुलगी तीन वर्षाची व मुलगा भाऊसाहेब नऊ महिन्यांचा होता. इतक्या कमी वयात पतीचे निधन झालेले असताना तीन मुलांची जबाबदारी अंगावर घेत आईने मोठ्या हिमतीने परिस्थितीवर मात केली. त्यात जवळच असणारे वासुंदे येथील मामा बर्वे परिवार, भालेकर परिवार व मावशी काका कै .तुकाराम ठुबे यांचा परिवार आईच्या पाठीशी ठाम उभा होता. आज आई गेली पण तिच्या पाठीमागे दोन मुली ,एक मुलगा , नातवंडे, पतवंडे असा चाळीस ,पन्नास लोकांचा मोठा परिवार मागे आहे.



'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com